ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख १६ जुलै, १९५८ | अंक २९

## विविध माहिती

**फुप्फुसांतील काळपुळी**— ब्रिटनच्या क्षयरोगविरोधी संघटनेचे अध्यक्ष डॉ. टुसॉ ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं धूम्रपानाच्या व्यसनामुळें ब्रिटनमध्यें फुप्फुसाच्या काळपुळीच्या विकाराची सांथच चालू आहे. त्यांच्या म्हणण्याला लंडन येथील एक शस्त्रक्रिया तज्ज्ञानें पाठिंबा दिला आहे. त्याच्या मतानें शाळांपासूनच धूम्रपान विरोधी प्रचार करण्यांत आला पाहिजे.

**अंदमानांतील लोकांचें स्वास्थ्य**—अंदमान व निकोबार ह्या बेटांत राहणाऱ्या लोकांच्या स्वास्थ्यासाठी भारत सरकार दरडोई २,००० रु. खर्च करीत आहे. भारताच्या दरडोई उत्पन्नाच्या सात पट एवढी ही रक्कम आहे. १९५१ च्या शिरगणतीप्रमाणें बेटांतील लोकसंख्या ३१,००० आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत बेटावर ६०० लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**नगररचनेची चर्चा**—येत्या ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यांत जयपूर येथें नगररचना ह्या विषयासंबंधीं एक चर्चा घडवून आणण्यांत येणार आहे. इन्स्टिटयूट ऑफ टाऊन प्लॅनर्स ह्या संस्थेतर्फे करण्यांत येणारा हा सातवा उपक्रम आहे. चर्चेंत जुन्या शहरांची पुनर्रचना, ह्या विषयावरहि विचारविनिमय होणार आहे.

**धनुष्य-बाणांवर बंदी**—अहमदाबाद विभागांतील पोलिस-प्रमुखांची परिषद बडोदा येथें भरली होती. राजपिपला, छोटा उदेपूर व पंचमहाल ह्या भागांत धनुष्य-बाण जवळ बाळगण्यास बंदी करण्यांत यावी अशी शिफारस त्यांनीं मुंबई सरकारला केली आहे. असें केल्यानें ह्या भागांतील गुन्ह्यांचें प्रमाण ५० टक्क्यांनीं कमी होईल असें त्यांचें मत आहे.

**तुलना करून पहा**—रशिआचे उपपंतप्रधान मि. मिकोयन ब्रुसेल्स येथील जागतिक प्रदर्शन पहाण्यास गेले असतां त्यांना भारतांत ब्रिटन बांधीत असलेल्या एका पोलादाच्या कारखान्याची प्रतिकृति दाखविण्यांत आली. त्यावर ते म्हणाले कीं रशिआहि असाच एक पोलादाचा कारखाना भारतांत बांधीत आहे; लोकांनीं कोणता चांगला तें ठरवावें.

**नर्मदेवर पांच नवे पूल**—पूर्व मध्यप्रदेशांत अमरकंटक ह्या ठिकाणीं उगम पावून पश्चिमेकडे वहाणाऱ्या नर्मदा नदीवर मध्यप्रदेश सरकार पांच नवे पूल बांधीत आहे. त्यांपैकी एक पूर्ण झाला असून बाकीच्यांचें काम चालू आहे. पुलांसाठी एकूण एक कोटी रुपये खर्च येईल.

**कीटकनाशक नवें रसायन**—हैदराबाद येथील रिजनल रिसर्च लॅबोरेटरी ह्या संस्थेनें कीटकांचा नाश करणारें एक नवें रसायन शोधून काढलें आहे. हें रसायन भारतांत मिळूं शकणाऱ्या कच्च्या मालापासूनच तयार करण्यांत येत असल्यानें त्याची उत्पादनाची किंमत बेताची पडेल.

**निर्यात वाढविण्याचे प्रयत्न**—न्यूझीलंडच्या आयात-निर्यात व्यापारांत प्रतिकूल तफावत पडत चालल्यामुळें सरकारनें निर्यात वाढविण्याची जोराची खटपट करण्याचें ठरविलें आहे. जपान, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, फिजी बेटें, इत्यादि देशांशीं ह्या बाबतींत बोलणीं होणार आहेत.

**कैद्यांच्या मुलांना सवलत**—अंदमान व निकोबार बेटांतील सुटका झालेल्या गुन्हेगारांच्या मुलांना शैक्षणिक सवलती देण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. ह्या कैद्यांच्या मुलांना माध्यमिक शाळांपर्यंतचें शिक्षण घेण्यासाठी फी यावी लागणार नाहीं. ही सवलत भारतामधील कोठल्याहि शिक्षणसंस्थेंत त्यांना मिळूं शकेल.


## * सारस्वत कोऑपरेटिव्ह बँक लि. *

स्थापना १९१८ ] सारस्वत बँक-गृह, मुंबई ४. [ टेलिफोन २७०९४

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | :: | :: | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | :: | :: | रु. ७,९७,८४० |
| रिझर्व्ह फंड | :: | :: | रु. ८,३४,७-० |
| ठेवी | :: | :: | रु. १,७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | :: | :: | रु. १,९९,६९,००० |

बँकेच्या शाखा : फोर्ट, दादर, वरळी, माहिम, पुणें, बेळगांव.
महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, गिरगांव, मुंबई ४.

**कलकत्ता विद्यापीठाला देणगी**—कलकत्ता विद्यापीठानें आपल्या अर्थशास्त्रीय खात्याचा विस्तार करण्याची योजना आंखली आहे. ही योजना अंमलांत आणण्यासाठी विद्यापीठाला अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशनतर्फे २,५०,००० रुपयांची देणगी मिळाली आहे. विस्ताराची योजना पंचवार्षिक योजनेच्या कालांत पूर्ण होईल.

**कॉलऱ्याच्या लसीची देणगी**—मलायांतील कॉलऱ्याच्या साथीला आळा घालण्यासाठी तेथील सरकारनें भारताकडे कॉलराप्रतिबंधक लस मागितली होती. भारत सरकारनें ह्या विनंतीस मान देऊन १,५०,००० सी. सी. लस पाठविली आहे. रोगाच्या साथीस आळा घालण्यासाठी तिचा फार उपयोग होणार आहे.

**केरळमधील सरकारी नोकरांचा पगार**—केरळ सरकारच्या एकूण उत्पन्नापैकी ४०.८ टक्के उत्पन्न सरकारी नोकरांचा पगार वाटण्यावर खर्च होतो, अशी माहिती राज्याच्या विधानसभेंत देण्यांत आली. कनिष्ठ नोकरांच्या वेतनांत जी वाढ करण्यांत आली त्यामुळें ही टक्केवारी ३.२ टक्यांनीं वाढणार आहे.

**भाक्रा धरणांतील पाणी**—भाक्रा येथें बांधण्यांत येत असलेल्या धरणांत सतलज नदीचें पाणी आतां अडविण्यास प्रारंभ झाला आहे. ह्या वर्षी ठरविण्यांत आलेली पातळी पाण्यानें गांठली असून आतां तें मुद्दाम ठेवण्यांस आलेल्या वाटेनें खाली पडत आहे. हा मानवनिर्मित धबधबा २०० फूट उंचीचा आहे.

**बोटी बांधण्यांत जपानचा विक्रम**—१९५७ मध्यें जपानमधील बोट-कारखान्यांनीं बोटी बांधण्याचा उच्चांक गांठला. युद्धोत्तर कालांत कोणत्याहि एका वर्षापेक्षा अधिक म्हणजे ८१ लाख टन वजनाच्या बोटी जपाननें गेल्या सालीं बांधल्या. जपानच्या मानानें पश्चिम युरोपांतील कांहीं देशांची ह्या बाबतींतील प्रगति कमीच आहे.

**झांशी येथील तांत्रिक शाळा**—उत्तर प्रदेशांत झांशी ह्या ठिकाणीं असलेली तांत्रिक शिक्षणाची शाळा रेल्वेबोर्डानें आपल्याकडे घेतली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत रेल्वेवर काम करण्यासाठी जो कुशल कामगारवर्ग लागेल तो जलद तयार करण्याच्या दृष्टीनें हा बदल करण्यांत आला आहे.

**संपामुळें नुकसान**—टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या कारखान्यांत नुकताच संप झाला, त्यामुळें २.७ कोटी रुपये किंमतीच्या ४५,००० टन पोलादाचें उत्पादन कमी झालें. कामगारांचें २४.२३ लक्ष रुपयांचें वेतन बुडालें. संपाबरोबरच्या दंग्यांत मालमत्तेचें ११ लक्ष रु. नुकसान झालें.

**कराची येथील विमानतळ**—कराची येथील विमानतळावर सध्यां जेटच्या साहाय्यानें उड्डाण करणारीं मोठीं विमानें उतरूं शकत नाहींत. त्यांना लागणारी मोठी पट्टी बांधण्याचें व विमानतळ अद्यावत् करण्याचें पाकिस्तान सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं १ कोटी रुपये खर्च येणार आहे. पट्टीची लांबी १०,५०० फूट असेल.


दातांच्या स्वच्छतेसाठीं

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक: – श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

✳ दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ✳
( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २. प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )
अध्यक्ष श्री. ग. रा. साठे
मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

| | |
|---|---|
| अधिकृत, विकीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल ... ... | रु. ७,३०,४९० |
| खेळतें भांडवल ... ... | रु. ५८,००,००० |

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १३/४ टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबावत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १६ जुलै, १९५८.





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चीन व भारत ह्यांच्यामधील व्यापाराची वृद्धि

भारत व चीन ह्या देशांमधील आयात–निर्यात व्यापाराची वृद्धि करतां येणें कितपत शक्य आहे, तें अजमावण्यासाठी चीनचें पांच जणांचें एक प्रतिनिधिमंडळ सध्या भारताचा दौरा करीत आहे. प्रतिनिधिमंडळानें म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्सला बंगलूर येथें भेट दिली. त्यावेळीं चेंबरचे अध्यक्ष श्री. नंजाप्पा ह्यांनीं भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा उल्लेख करून भारतामधून निर्यात करण्यांत येत असणाऱ्या मालाची प्रतिनिधिमंडळाला ओळख करून दिली.

चीनच्या प्रतिनिधींची ही भेट त्या देशाच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें घडवून आणलेली असून त्यांचें नेतृत्व चीनच्या परदेशीय व्यापार खात्याचे उपसंचालक करीत आहेत. श्री. नंजाप्पा ह्यांनीं पाहुण्यांचें स्वागत केलें आणि ते पुढें म्हणाले कीं, भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत औद्योगिक विकासावर विशेष भर देण्यांत आला आहे. पक्क्या मालाच्या बाजारपेठा हस्तगत करण्याच्या दृष्टीनेंहि प्रयत्न करण्यांत येत आहेत. सध्या भारतामधून कापड, तागाचा माल, अशुद्ध मँगनीझ व लोखंड, चहा, एंजिनिअरिंगचा माल, यंत्रसामुग्री इत्यादि वस्तू परदेशांत पाठविल्या जातात. भारत व चीन ह्यांचे संबंध पुरातन कालापासूनचे आहेत. चीनमध्यें झपाट्यानें होत असलेल्या औद्योगिक वाढीकडे भारताचें लक्ष आहे. उभयता देशांत पुष्कळच बाबतींत साम्य असल्यामुळें एकमेकांच्या अनुभवाचा परस्परांना फायदा होण्यासारखा आहे. चिनी प्रतिनिधिमंडळाच्या नेत्यांनीं उत्तरादाखल केलेल्या भाषणांत सांगितलें कीं, चीन व भारत ह्यांचे संबंध प्राचीन असले तरी गेल्या कांहीं वर्षांत म्हणजे दोन्हीं देश स्वतंत्र झाल्याच्या काळांतच व्यापारी संबंध प्रस्थापित होऊं लागले आहेत. हे संबंध अधिक वाढविणें शक्य आहे. कारण, दोन्ही देश आपआपलें औद्योगीकरण त्वरित साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. चीन भारताला ३० प्रकारचा माल पुरवीत आहे. गेल्या दोन वर्षांत भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनतर्फे चीननें भारताला रासायनिक मालाचा बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पुरवठा केला आहे. अगदीं अलीकडे चीननें यांत्रिक हत्यारें व छापण्याची यंत्रसामुग्री ह्यांचीहि निर्यात भारताला केली आहे. कांहीं वर्षांपूर्वी चीनलाच ह्या वस्तूंची आयात करावी लागत होती. चीनचें औद्योगीकरण झपाट्यानें झाल्यामुळें ही गोष्ट शक्य झाली. भारताला लागणारा औद्योगिक कच्चा माल व यंत्रसामुग्री चीन पुरवूं शकेल; उलटपक्षीं भारताकडून चंदनाची लांकडें, मिरी, तंबाखू इत्यादि माल घेण्याची चीनची इच्छा आहे. मद्रास व बंगलोरमधील कारखाने पाहिल्यावर भारताकडून चीनला पुष्कळ प्रकारचा एंजिनिअरिंगचा मालहि मिळूं शकेल ह्याची खात्री पटते. भारतांत तयार झालेला अशा प्रकारचा माल पाश्चात्य देशांतील मालाच्या तोडीचा असतो ह्यांत शंका नाहीं. आशिआंतील हे दोन देश परवापर्यंत मागासलेले होते. पण आतां त्यांमधील उद्योगधंद्यांची वाढ होत असून उभयता देशांत औद्योगिक मालाची देवाणघेवाण करणें शक्य होऊं लागलें आहे.

## जर्मन स्त्रियांना समानतेचे हक्क

प. जर्मनीमध्यें स्त्रियांना व पुरुषांना एकाच कायदेशीर पातळीवर आणणारा कायदा नुकताच अंमलांत आला आहे. जर्मनीमधील विवाहासंबंधीचा पाया कोड ऑफ नेपोलियन ह्या कायद्यावर आधारलेला होता. ह्या कायद्याप्रमाणें पुरुषानें स्त्रीचें रक्षण करावें आणि स्त्रीनें पुरुषाची आज्ञा मानावी, असा दंडक होता. अर्थात्, गेल्या दीडशें वर्षांच्या कालांत प्रत्यक्ष परिस्थिति पुष्कळच पालटली आहे. जर्मन स्त्रियांना मतदानाचा हक्क कांहीं वर्षांपूर्वी मिळाला असला तरी इतर कित्येक बाबतींत त्या पुरुषाच्या बरोबरीच्या मानल्या जात नसत. पण आतां घरकाम करणाऱ्या जर्मन स्त्रीला पुष्कळच हक्क मिळाले आहेत, व तिच्यावर जबाबदाऱ्याहि पडल्या आहेत. विवाहित स्त्री आपल्या नवऱ्याच्या धंद्याची भागीदार म्हणून मानली जाईल. कुटुंबाच्या एकूण मालमत्तेपैकीं व उत्पन्नापैकी तिचा वांटा निम्मा राहील. तिचा नवरा मृत्युपत्र न करता दिवंगत झाला तर तिला हा वांटा घेतां येईल. तिला घरखर्चाची रक्कम आगाऊ घेतां येईल. आणि स्वतः मिळविलेले पैसे मनाप्रमाणें खर्च करता येतील. त्याचबरोबर स्वतः केलेल्या कर्जाबद्दल ती व्यक्तिशः जबाबदार राहील. नवऱ्याला कुटुंबाच्या योगक्षेमाला पुरेसे पैसे मिळवितां येत नसतील अगर तो बेकार असेल तर तिला घराबाहेर जाऊन कमाई करावी लागेल. जर्मन स्त्रीची परिस्थिति आतां परंपरागत परिस्थितीच्या मानानें खूपच सुधारली आहे. परंतु नव्या कायद्यामुळें जर्मन कुटुंबाची घडी विस्कटून जाणार आहे. जर्मनींतील व इतर समाजशास्त्रज्ञ नव्या कायद्याचे परिणाम काय होतील तिकडे लक्ष ठेवून रहातील.

---

## देणगीकरांत सूट मिळण्याची तरतूद

करपात्र अशा १०,००० रु. वा त्याहून अधिक किंमतीच्या देणग्या देणाऱ्यांनीं हा कर अगोदर भरल्यास त्यांस १९५८ च्या देणगीकर कायद्यानुसार करांत सूट मिळण्याची तरतूद आहे. ही सूट मिळण्यासाठी देणगीदारांनीं देणगी दिल्यापासून १५ दिवसांत हा कर भरला पाहिजे. परंतु १६ जुलै, १९५८ पूर्वी देण्यांत आलेल्या अशा सर्व देणग्यांवरील करांत, देणगीदारानें १ ऑगस्ट १९५८ पूर्वी कर भरल्यास, सूट मिळेल.

हा कर अगोदर भरण्याचें प्रमाण देणगीची किंमत ५०,००० रुपयांपेक्षा जास्त नसल्यास तिच्या ४ टक्के, ५०,००० रुपयांपेक्षा जास्त परंतु २ लाख रुपयांपेक्षा जास्त किंमत नसलेल्या देणग्यांचे बाबतींत तिच्या ८ टक्के व २ लाख रुपयांहून जास्त किंमतीच्या देणग्यांबाबत तिच्या १५ टक्के, असें आहे.

वर निर्देशिल्याप्रमाणें देणगीदारानें अगोदरच कर भरल्यास, त्याच्या एकूण उत्पन्नाच्या कर आकारणीचे वेळीं त्यानें वरीलप्रमाणें भरलेल्या रकमेखेरीज त्या रकमेच्या १० टक्के इतकी रक्कम त्याच्या नांवें जमा करण्यांत येईल. करपात्र देणग्या दिलेल्या व्यक्तींस वरीलप्रमाणें सूट पाहिजे असल्यास त्यांनीं नजिकच्या प्राप्तीकर कचेरीकडून आवश्यक तें चलन मिळवावें आणि चलनांतील रक्कम उपरोक्त कालमर्यादेपूर्वी नजिकच्या ट्रेझरींत भरावी, अशी त्यांस विनंती करण्यांत येत आहे.

## भारतांतील परदेशी हुंडणावळीची परिस्थिति (२)

### योजना अर्धवट सोडणें नुकसानकारक

" दुसरी पंचवार्षिक योजना फार मोठ्या प्रमाणावर आंखलेली आहे, तिची व्याप्ति कमी ठेवायला हवी होती,' अशी टीका ऐकूं येते. ज्यावेळीं योजना तयार करण्यांत आली, त्यावेळीं सरकार, योजनामंडळ व कित्येक तज्ज्ञ अर्थशास्त्री ह्यांना तिचा आकार योग्य असाच वाटला. फेडरेशन ऑफ चेंबर्स ऑफ कॉमर्सला तर ती योजना जरा लहानच वाटली. आतां आपल्याला आजच्या स्थितीचाच फक्त विचार करावयाचा आहे. पोलाद, वीजउत्पादन, कोळसाउत्पादन व वहातूक ह्या अगदीं जरूरीच्या बाबींसच आतां योजनेंत अग्रस्थान आहे. त्यांपैकी कोणत्या बाबींवर कोठें व किती कपात करतां येईल, हें फक्त सरकारच ठरवूं शकेल. कारण, त्याच्याजवळच त्याबाबत तपशीलवार माहिती असूं शकणार. ह्या बाबींच्या आजच्या अवस्थेंत त्या थांबविणें म्हणजे खूपच नुकसान सोसावें लागणें होय. कारण, त्यांवर अगोदरच कितीतरी खर्च झालेला आहे.

### आयातीच्या नियंत्रणांची मर्यादा

' परदेशी हुंडणावळीच्या अडचणींवरील तात्काळ उपाय म्हणजे आयात कमी करणें, हा होय. सरकार त्या दिशेनें कसून प्रयत्न करीतच आहे. परंतु फार मोठी कपात केली, तर यंत्र-सामुग्रीची व भांडवली मालाची आयात कमी होऊन औद्योगीकरणांत खंड पडेल. सहाजिकच, उपभोग्य मालाच्या आयातीलाच मोठ्या कपातीची कुऱ्हाड ह्यापुढें सोसावी लागणार. त्यांत उपभोग्य जिनसांच्या उद्योगधंद्यांच्या कच्च्या मालाचाहि समावेश होणार. अन्नाच्या आयातीसाठी खास वेगळी व्यवस्था केली, तरी उपभोग्य मालाची आयात ठराविक मर्यादेखाली उतरविली तर महागाई वाढण्याकडे प्रवृत्ति होत जाणार. आयात माल कमी झाला कीं त्याची किंमत खूपच वाढते, ह्याचा अनुभव आहेच.

### निर्गतीला चालना

" वाढत्या आयातीची किंमत वाढत्या निर्यातीनें भागविणें, हा सर्वांत उत्कृष्ट मार्ग होय. तत्त्व ह्या दृष्टीनें ही गोष्ट मान्य केली गेली, तरी प्रत्यक्ष कृतीचे वेळीं तिला योग्य तें महत्त्व दिलें जात नाहीं, अशी टीका ऐकूं येते. स्थानिक अडचणींना नसतें महत्त्व दिलें जातें; त्यामुळें उत्पादन खर्च वाढून परदेशीय बाजारपेठेंत स्पर्धा करणें कठीण होतें, अशी तक्रार आहे. सध्यां परदेशी हुंडणावळ अत्यंत दुर्मिळ आहे. ज्या मालाच्या निर्गतीनें परदेशी हुंडणावळ मिळवितां येईल त्या मालाचा अंतर्गत खप वाढण्यास प्रोत्साहन मिळतां कामा नये. परदेशी बाजारपेठांत आतां खरेदीदार अडवून किंमती कमी करीत आहेत. त्यामुळें निर्गत करणारांना अधिक प्रोत्साहनाची आवश्यकता आहे.

### भारताची उत्कृष्ट पत

" परदेशी मदतीबद्दलची परिस्थिति १९५६ मध्यें आशादायक नव्हती. परंतु, भारताला मदत करणें जागतिक दृष्टीनेंहि अगत्याचें आहे, ह्याची जाणीव मित्रराष्ट्रांना, विशेषतः अमेरिकेला झाली आहे. भारत आपलें नाणेंविषयक व करविषयक धोरण पार पाडण्यांत कसूर करीत नाहीं, अगदीं जरूर असल्याखेरीज भारत मदत मागीत नाहीं, मदतीचा जास्तींत जास्त चांगला उपयोग केला जातो आणि देणें ठरावाप्रमाणें देण्याचा भारताचा निर्धार आहे, अशी आपल्या देशानें ख्याति मिळविली आहे. अमेरिकेंतील भारतविषयक वातावरण सुधारलें आहे. बारा महिन्यांपूर्वी अशी परिस्थिति नव्हती.

### परराष्ट्रीय देणग्या व कर्जें

" दोन वर्षांपूर्वी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेस प्रारंभ झाला, तेव्हांपासून आतांपर्यंत ८३२ कोटी रुपयांची मदत मिळाली आहे किंवा देऊं करण्यांत आली आहे. त्याचा तपशील असा:—

| | | ( कोटी रुपये ) |
|---|---|---|
| अमेरिका | देणग्या | ६८ |
| | कर्जें | २४६ |
| आय. बी. आर. डी. | कर्जें | १३१ |
| यू. एस. एस आर. | कर्जें | १२३ |
| इं. मो. फंड | कर्जें | ९५ |
| कॅनडा | देणग्या | १२ |
| | कर्जें | १२ |
| इतर | देणग्या | ३ |
| | कर्जें | १३५ |

### अविकसित देशांकडे वाढतें लक्ष

" ग्रेटब्रिटनमधील आपल्या शिलका आपण वापरल्या त्याचा परिणाम त्या देशाच्या आर्थिक परिस्थितीवर त्यानें आपल्याला सरळ कर्ज दिल्यासारखाच झाला, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ही सर्व मदत खूपच मोठी आहे; पण आपल्या गरजा भागविण्यास पुरेशी नाहीं. योग्य तें करविषयक व नाणेंविषयक धोरण अंमलांत आणण्याचा निर्धार असेल आणि सरकारला लोकांचा सक्रिय पाठिंबा असेल, तर बाहेरील जगाकडून आणखी मदतीची अपेक्षा करणें चुकीचें होणार नाहीं. युरोपच्या पुनर्घटनेनंतर आतां अविकसित देशांच्या उद्धाराच्या जरूरीकडे इतर देशांतील लोकांचें लक्ष लागलें आहे. जागतिक बँक, इं. मो. फंड व इंटरनॅशनल फिनॅन्स कॉर्पोरेशन ह्यांच्या येत्या वार्षिक सभा दिल्ली येथें ऑक्टोबरच्या प्रारंभीं भरणार आहेत. त्यांच्या सभा आशिआंत भरण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे; तो अविकसित देशांच्या दृष्टीनें शुभदायक ठरेल अशी आशा आहे."

---

**काश्मीरला जाणारे हौशी प्रवासी**—ह्या वर्षी काश्मीरला जाणाऱ्या हौशी प्रवाशांच्या संख्येनें उच्चांक गांठला आहे. १९५६ सालीं काश्मिरांत गेलेल्या प्रवाशांपेक्षा ही संख्या २,००० नीं जास्त आहे. आतांपर्यंत काश्मीरमधील सृष्टी-सौंदर्याचा आनंद लुटण्यासाठी ३३,००० प्रवासी गेले. हौशी प्रवाशांपासून मिळणारा पैसा हा काश्मीरच्या उत्पन्नाची मोठी बाब आहे.

**विनातिकिट प्रवास**—उत्तरप्रदेशांतील गोरखपूर रेल्वेस्टेशन-वर विनातिकिट प्रवाशांची अचानक तपासणी करण्यांत आली असता २१० प्रवासी विनातिकिट सांपडले. त्यांपैकी ४० रेल्वेचेच नोकर होते. त्यांपैकी ८६ प्रवाशांपासून ९५० रुपये वसूल करण्यांत आले बाकीच्यांना तुरुंगाची वाट दाखविण्यांत आली.

**रशिआला निर्यात होणारा माल**—पश्चिम युरोपांतील राष्ट्रें व अमेरिका, लष्करी दृष्टीनें महत्त्वाचा ठरूं शकणारा अनेक प्रकारचा माल रशिआला निर्यात करीत नाहींत. पण आतां अशा मालाची यादी कमी करण्यांत येणार आहे. कारण, रशिआंत झालेल्या औद्योगिक प्रगतीमुळें लांबलचक यादीला फारसा अर्थ राहिलेला नाहीं.

वनमहोत्सवाच्या निमित्त खास लेख

# वनवर्धन

( लेखक : श्री. वा. कृ. कोगेकर, एल्. एजी. )

भारतांत जंगलाखालील क्षेत्र इतर देशांच्या मानानें बरेंच कमी आहे, असें दिसून येतें. भारतांतील जंगलाच्या क्षेत्राचें प्रमाण एकंदर भौगोलिक क्षेत्राच्या सुमारें ५ टक्के पडतें, तर अमेरिकेमध्यें तें एकंदर क्षेत्राच्या तिसरा हिस्सा, म्हणजे ६२ कोटी एकर आहे. दरमाणशीं जंगलाचें क्षेत्र रशिआमध्यें ८ एकर, अमेरिकेमध्यें सुमारें ४½ एकर व भारतामध्यें फक्त सुमारें ½ एकर पडतें.

शेतीचा व जंगलाचा घनिष्ट संबंध असल्यामुळें जंगलाचें क्षेत्र भरपूर असलेल्या देशांत शेतीचें उत्पन्न वाढून जंगलापासून मिळणाऱ्या निरनिराळया कच्च्या मालामुळें उद्योगधंदेहि निघून लोकांस कामधंदा भरपूर मिळूं शकतो. राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेमध्यें जंगलाचें स्थान फारच महत्त्वाचें आहे. झाडाचा प्रत्येक भाग, पानें, फुलें, फळें, लांकूड, महत्त्वाचा असतो. कागद तयार करण्याकरितां लागणारा लगदा ( पल्प ), विडीकरितां लागणारीं पानें, गोंद, तेलें, राळ, रबर वगैरे अनेक पदार्थांपासून देशांतील नाना प्रकारच्या गरजा भागून देशाच्या संपत्तींतहि भर पडते.

वरीलशिवाय झाडापासून अनेक तऱ्हेचे फायदे मिळतात ते वेगळेच.

**झाडें व पाऊस :**—भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळें शेती हा महत्त्वाचा धंदा आहे. भारतामधील शेती पुष्कळशी पावसावर अवलंबून आहे. झाडांचा व पावसाचा अन्योन्य संबंध किती घनिष्ट आहे, यासंबंधानें जास्त ऊहापोह करण्याची आवश्यकता नाहीं. समुद्रांतील व इतर जलशयांतील पाण्याची सूर्याच्या उष्णतेमुळें वाफ होऊन त्याचे ढग बनून नंतर पाऊस पडतो हें आपण सर्व जाणतोच. याप्रमाणें पावसाचा ⅔ भाग जलसंचयांतील पाण्याच्या होणाऱ्या वाफेपासून होत असून बाकीचा ⅓ झाडापासून होणाऱ्या बाष्पीभवनापासून होतो, हें विसरतां कामा नये. सुमारें एक पौंड वजनाचें लांकूड तयार होण्यास २०० पौंड पाण्याचें अभिसरण होऊन बाष्परूपानें त्याचें विसर्जन होत असतें. यावरून झाडाचा व पावसाचा किती घनिष्ट संबंध आहे व पावसाचें प्रमाण वाढण्यास झाडांची किती आवश्यकता आहे, याची कल्पना येऊं शकेल. इजिप्त देशामध्यें वर्षातून फक्त १० दिवसच पाऊस होत असे. परंतु नाईल नदीच्या बाजूनें जंगलाची वाढ झाल्यापासून वर्षातून पावसाचे ४० दिवस झाले. यावरूनहि झाडें व पाऊस यांचा किती निकटचा संबंध आहे, हें लक्षांत येईल.

**झाडें व जमिनीचें संरक्षण :**—पावसामुळें जमिनीच्या धुपून जाण्याच्या क्रियेस, झाडापासून अटकाव होतो. त्यामुळें पावसाचें पाणी जमिनींत मुरून, विहिरी, तलाव यांस पाण्याचा झिरपा मिळून त्यांतील पाण्याचा सांठा वाढला जातो डोंगर-पठारावर झाडांची व झुडुपांची वाढ झाल्यानें डोंगरावरील दगडमाती वाहून न गेल्यामुळें, डोंगर मोकळे किंवा बोडके पडत नाहींत. झाडांच्या वाढीमुळें पावसाचें प्रमाणहि वाढण्यास मदत होते.

**झाडें व खत :**—भारतासारख्या कृषिप्रधान देशास शेती-करितां पाण्याप्रमाणेंच खतासहि अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. झाडापासून मिळणारा पालापाचोळा ( हिरवा व वाळलेला ) यापासून अत्यंत उपयुक्त असें खत तयार होतें. हा वनवर्धनापासून एक मोठाच फायदा होतो. याशिवाय जनावरांपासून मिळणाऱ्या शेणखताचा पूर्ण फायदा मिळण्याकरितां झाडें अप्रत्यक्षपणें कारणीभूत होतात.

**चराऊ रानें व जंगलें :**—चराऊ रानें हा जंगलाचा एक महत्त्वाचा भाग आहे, असें परदेशांत समजलें जातें व या रानांची निगा तिकडे फारच पद्धतशीरपणें ठेवली जाते. चराऊ रानाचे लहान लहान भाग करून आळीपाळीनें, जनावरांस चारण्याकरितां व गवत कापण्याकरितां त्यांचा उपयोग करण्यांत येतो. यामुळें जनावरांकरितां भरपूर चारा मिळून त्यांस मोकळेपणें हिंडतां येतें. अमेरिका देशामध्यें एकंदर जंगलाच्या क्षेत्रापैकी सुमारें ७ कोटी एकर क्षेत्र चराऊ रान म्हणून राखण्यांत आलेलें आहे. या रानामध्यें चांगल्या जातीचीं गवतें लावण्यांत येतात.

**सरपण किंवा जाळण्याकरितां लांकूड :**—आपल्या देशामध्यें लांकूड हेंच जळणाचें मुख्य साधन असल्यामुळें त्याचा भरपूर पुरवठा होण्याकरितां वनवर्धन हाच एक मोठा आधार होय. शेतीच्या दृष्टीनें शेणखताचें महत्त्व किती आहे हें आपण जाणतोच. परंतु सरपणाच्या भरपूर पुरवठ्याच्या अभावीं शेणाच्या गोवऱ्या करून त्यांचा उपयोग जळणाकरितां करण्यांत येतो. हा शेणाचा होणारा नाश शक्य तितका टाळण्याकरितां देशांत झाडांची लागवड दरसाल सारखी वाढत गेली पाहिजे. तरच हा शेणखताचा होणारा नाश थांबवितां येईल.

भारतामध्यें दरसाल सुमारें २२ कोटी ४० लक्ष टन गोवऱ्यांचा ( वाळलेल्या ) जळणाकडे उपयोग करण्यांत येतो. या गोवऱ्यांकरितां सुमारें १५० कोटी टन शेणाचा उपयोग होतो. म्हणजे, दरसाल शेतीच्या उपयोगी येणाऱ्या १५० कोटी टन खताचा नाश होतो, असें दिसून येईल. हा नाश वाचविणेकरितां जंगलची वाढ हाच एक उपाय होय. झाडांची तोड होईल तसतसी नवीन झाडांची लागवड होत गेली पाहिजे. सरपणाकरितां बाभळीचें लांकूड विशेष पसंत केलें जातें. त्याकरितां पडित जागीं वगैरे या झाडांची लागवड होत गेली पाहिजे.

**लांकडाचा जळणाकरितां उपयोग व धंदे :**—देशामध्यें निर्माण होणाऱ्या धंद्यास लांकडाच्या सरपणाशिवाय ज्वलनाकरितां दुसरें साधन नसल्यानें या धंद्यास जळणाकरितां लांकडाचा मोठाच पुरवठा व्हावा लागतो. मुंबई राज्यामध्यें सध्या साखर तयार करण्याचे सुमारें १५ साखर कारखाने चालू आहेत व आणखी जास्त निघत आहेत. या कारखान्यांस दरसाल हजारों खंडी लांकडाचें सरपण लागतें. या दृष्टीनेंहि विचार करतां वनवर्धनाकडे विशेष लक्ष देण्याची जरूरी आहे, हें विसरतां कामा नये.

**नॉन एडिबल ऑइल इंडस्ट्री :**—ज्या तेलबियांपासून

निघणाऱ्या तेलाचा उपयोग खाण्याकडे होत नाहीं, अशा प्रकारचीं तेलबियें उत्पन्न करणारीं झाडें म्हणजे, निंब, करंज, मवरा, उंडी वगैरे सारखीं होत. हीं झाडें सध्यां सडकेच्या कडेला, बांधावर वगैरे मधून मधून दिसून येतात. वरील प्रकारच्या झाडांच्या बियांपासून निघणाऱ्या तेलाचा उपयोग साबण, वगैरे-सारखे पदार्थ तयार करण्याकरितां, लहान लहान धंदे खेडोंपाडीं काढण्याकरितां 'ऑल इंडिया नॉन-एडिबल ऑईल इंडस्ट्री असोसिएशन' या नांवाची एक संस्था नुकतीच स्थापन झालेली आहे. धनवर्धनाच्या कार्यक्रमांत वरीलसारख्या नॉन-एडिबल ऑईल देणाऱ्या झाडांचाहि समावेश होण्याची जरूरी आहे.

वर निदर्शित केलेलीं झाडेंहि सडकेच्या कडेला कोठेंकोठें दिसून येतात. त्यांचें बीं झाडाखालीं पडून जवळ जवळ व्यर्थच जातें, असें दिसून येतें. इतर ठिकाणीं एखादें-दुसरें झाड असल्यास त्याचें बींहि झाडाखालीं पडून वायाच जातें. या बाबतींत नवीन निघालेल्या संस्थेनें प्रसिद्धि देऊन व्यक्तिशः थोडथोड्या प्रमाणावर गोळा केलेलें बीं भाव ठरवून विकत घेण्याची व्यवस्था झाल्यास याकडे लोकांचें लक्ष वेधलें जाऊन फुकट जाणाऱ्या बियांचा उपयोग होऊन आसपासच्या लोकांस कांहीं काळ हें एक उद्योगाचें साधनहि होईल. या दृष्टीनें विचार व्हावा अशी सूचना आहे.

## बुटांच्या हजारो जोड्या पडून आहेत

पोलंडच्या सरकारनें सप्टेंबर, १९५७ मध्यें नॅशनल स्मॉल स्केल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशनकडून ५४,००० बूट जोड्यांच्या आयातीचा करार केला. बुटांचे नमुने पोलंडला धाडण्यांत आले, ते मान्य झाल्यानंतर कॉर्पोरेशननें दिल्ली, लुधियाना, कानपूर व आग्रा येथील कारखानदारांकडून नमुन्याप्रमाणें बूट बनवून घेतले. मे, १९५८ मध्यें पोलिश सरकारचा प्रतिनिधि दिल्लीला आला व त्यानें ५४,००० जोड्यांपैकीं ३४,००० जोड्या नापसंत केल्या. रशियानें मागविलेल्या बुटांचे बाबतींतहि असेंच झालें. प्रत्यक्ष ऑर्डरीपेक्षा ज्यास्त माल कॉर्पोरेशननें तयार करून घेतला होता, कारण आणखी ऑर्डरी मिळतील अशी त्याच्या अधिकाऱ्यांना आशा वाटत होती. हा सांठा हलविण्यासाठी दिल्लींतील व्यापाऱ्यांची मनधरणी करण्याची पाळी आली आहे.

## देना बँक

### ३० जून अखेरच्या सहामाहीचा नफा

दि देवकरण नानजी बँकिंग कं. लि. ला ३० जून, १९५८ अखेर संपलेल्या सहामाहींत, गेल्या वर्षअखेरचा रु. २,८०,३१९=५४ शिलकी नफा धरून, एकूण रु. १०,४१,२६७=४३ नफा झाला आहे. त्याचा विनियोग खालीलप्रमाणें करण्याचें डायरेक्टरांनीं ठरविलें आहे:—

३० जून, १९५८ अखेरच्या सहामाहीसाठी
प्रत्येक शेअरवर रु. १ – २५
करमाफ अॅड-इंटेरिम डिव्हिडंड...... रु. १,२५,०००=००
पुढील सहामाहीच्या हिशेबांत
वर्ग, त्यांतून इन्कम टॅक्स तरतूद करावयाची
रु. ९,१६,२६७=४३

रु. १०,४१,२६७=४३

३० जून, १९५७ अखेरच्या सहामाहीच्या नफ्याचा आंकडा (शिलकी नफा धरून) १०½ लक्ष रु. होता.

## हुंडणावळीच्या दराविषयीं मतभेद

### करारावरील सह्या पुढें ढकलल्या

सेंट्रल बँक ऑफ इजिप्त व सुएझ कॅनॉल कंपनी ह्यांचे दरम्यान, कालव्याच्या राष्ट्रीयीकरणाबद्दल कंपनीला द्यावयाच्या रकमेविषयीं वाटाघाटी होऊन कराराच्या छापील प्रती तयार झाल्या व सह्या करण्याचा दिवसहि निश्चित झाला. इजिप्तनें सहा वर्षांत मिळून २.३ कोटी पौंड (स्टर्लिंग) द्यावयाचे आहेत, परंतु पौंड-फ्रँकची हुंडणावळ करारांत नमूद नाहीं. फ्रेंच चलनाचें अवमूल्यन झालें तरी कंपनीचें नुकसान होऊं नये ह्याची तरतूद करारांत असावी, अशी कंपनीची मागणी आहे.

## परदेशी हुंडणावळीच्या शोधार्थ अर्थमंत्र्यांचा परदेशांत दौरा

भारतासाठी आणखी कर्जें मिळविण्याकरितां अर्थमंत्रि, श्री. मुरारजी देसाई, हे ग्रेट ब्रिटनला व अमेरिकेला भेट देणार आहेत. अर्थखात्याच्या इकॉनॉमिक अफेअर्स विभागाचे सेक्रेटरी श्री. बी. के. नेहरू, ह्यांनीं लंडन व वॉशिंग्टन येथें बोलणीं करून पूर्वतयारी केली आहे. श्री. मुरारजी देसाई २७ ऑगस्ट रोजीं लंडनला जाण्यास निघतील. भारताला आतांपर्यंत मिळालेलीं कर्जें नवे कारखाने व योजना ह्यांसाठी आहेत. औद्योगिक कच्चा माल कित्येक कारखाने चालू ठेवण्यासाठी हवा आहे, त्याकरितां आतां कर्जें हवीं आहेत. येत्या कांहीं महिन्यांनीं परदेशांचीं कांहीं देणीं भागवावयाचीं आहेत, त्यांची जागा घेणारीं नवीं कर्जेंहि मिळवावयास हवींत.

## सारस्वत को. बँकेचा नफा

दि सारस्वत को. बँकेला ३० जून, १९५८ अखेर संपलेल्या वर्षीं ९६,१७२ रु. नफा झाला. "अर्थ" च्या ९ जुलैच्या अंकांतील बँकेच्या व्यवहाराच्या आकड्यांत ही दुरुस्ती करावी.


वर्षाचा उत्तरार्ध सुरू झाला; तरी केलेली बचत पुरेशी झाली काय, हें अजमावा

दि

**बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

आपले पैसे योग्य प्रकारें गुंतविण्यास सल्ला व साहाय्य देईल.

**ठेवींवर आकर्षक व्याज**

स्पेशल सेव्हिंग्ज-द. द. ३॥ टक्के
सेव्हिंग्ज-द. द. ३ टक्के चालू ठेव-द. द. अर्धा टक्का

दहा हजार अगर त्यावरील रकमा अल्पमुदतीसाठी आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

**खेळतें भांडवल .... रु. दहा कोटींचे वर**

हेड ऑफिस, डेक्कन जिमखाना (पुणें), सोलापूर (फलटण गल्ली शाखा), नाशिक, अहमदनगर, श्रीरामपूर, किर्लोस्करवाडी, पनवेल व ठाणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्‌ची सोय असून लॉकर्स उपलब्ध आहेत.

**मराठवाड्यांत परळी वैजनाथ येथें बँकेची शाखा दि. २४ जुलै १९५८ पासून सुरू होईल.**

मुख्य कचेरी, पुणें २

चिं. वि. जोग
मॅनेजर

### ताजमहालाच्या शिल्पाला आव्हान

ताजमहालाच्या अप्रतिम शिल्पाला आव्हान देणारी एक भव्य इमारत आग्रा येथें गेलीं कित्येक वर्षें बांधण्यांत येत आहे. राधास्वामी ह्या पंथाच्या स्वामींची ही समाधि १९०४ पासून बांधण्यांत येत आहे. तेव्हांपासून आतांपर्यंत इमारत बांधण्याचें काम चालू आहे; आणि तरीहि ती पुरी होण्यास अद्याप कितीतरी वर्षें लागणार आहेत. इमारत पुरी झाल्यावर तिची उंची १९३ फूट होईल. इमारत दोन मजली असून तिच्या घुमटावर तांब्याचा एक कळस बसविण्यांत येणार आहे. ह्या कळसाची उंचीच ३२ फूट असेल. कळसाला सोन्याचा मुलामा देण्यांत येणार आहे. ही इमारत बांधण्यासाठी ५० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आलेला आहे. त्यापैकी २० लाख रुपये आतांपर्यंत खर्च झाले आहेत. सर्व इमारत संगमरवरी दगडाची बांधण्यांत येत असून तीसाठी लागणारा दगड मरकारा, बडोदा, इत्यादि भागांतून आणण्यांत येत आहे. इमारतीमधील नक्षीकामाची सजावट करण्यासाठी अमूल्य रत्नें वापरण्यांत येत आहेत. संगमरवरी दगडांत कोरलेल्या जाळ्यांची तर गर्दीच गर्दी होणार आहे. ह्यांपैकी कांहीं जाळ्यांचें काम गेलीं १० वर्षें चालू आहे. शहाजहान बादशहानें आपल्या प्रियतमेसाठी बांधलेल्या ताजमहालासाठी ३ कोटी रुपयांवर खर्च केला होता. ह्याच ताजमहालासारखा दुसरा परंतु काळ्या संगमरवरी दगडाचा ताजमहाल स्वतःच्या कबरीसाठी बांधण्याची त्याची इच्छा होती. त्याप्रमाणें यमुनेच्या दुसऱ्या कांठाला पायाहि घालण्यांत आला आहे. तो अजून दृष्टीस पडतो. ह्या दुसऱ्या ताजमहालासाठी १६ कोट रु. खर्च करण्यांत येणार होते.

---

### कु. ग्लॅडिज यूलची मालमत्ता

पूर्व भारतांतील तागाच्या धंद्यांतील एक उद्योगपति, सर डेव्हिड यूल, ह्यांची कन्या व ग्रेटब्रिटनमधील एक धनाढ्य स्त्री, कु. ग्लॅडिज यूल, ही ५३ व्या वर्षी लंडनमध्यें गेल्या ऑगस्ट महिन्यांत मरण पावली. तिनें आपल्या पाठीमागें ठेवलेल्या मिळकतीवर ४½ कोटी रुपये कर सरकारनें वसूल केला. तिनें आपली सेक्रेटरी, कु. पॅट्रिशिया वुल्फ, हिला मृत्युपत्रान्वयें १३ लक्ष रु. दिले. इतर कित्येक धर्मादाय संस्थांनाहि मृत्युपत्रान्वयें मोठी मदत मिळाली.

---

### भारत सरकारची स्टेशनरीची खरेदी

भारत सरकारनें १९५७–५८ मध्यें ४३१ लक्ष रुपयांची स्टेशनरी खरेदी केली. १९५४–५५ मध्यें त्या खरेदीची रकम ३१३ कोटी रुपये होती. म्हणजे, तीन वर्षांचे अवधींत, तिच्यांत ११८ लक्ष रुपयांची वाढ झाली. एकूण खरेदीशीं आयात मालाचें प्रमाण १९५४–५५ मध्यें २·७५% होतें, तें १९५७–५८ मध्यें ०·६२% वर उतरलें.

---

**काथ्याच्या धंद्याचें स्थैर्य**—केरळ राज्यांत काथ्याच्या धंद्यावर उपजीविका करणारे लक्षावधि लोक आहेत. किंमतींत होणाऱ्या चढउतारामुळें धंद्याला जी अस्थिरता येते ती नाहींशी करण्यासाठी राज्य सरकारनें उपाययोजना करण्याचें ठरविलें आहे. ह्या बाबतींत मध्यवर्ती सरकारचें साह्य घेण्यांत येणार आहे.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११ ★ टेलिफोन : ३४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | २½ टक्के |
| २ वर्षें | २¾ टक्के |
| ३ वर्षें | ३ टक्के |
| ५ वर्षें | ३½ टक्के |
| १० वर्षें | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ११–७–५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक



## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१.
( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ४२,०८,००० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. ६६,००,००० |
| | रु. १,०८,०८,००० |
| गंगाजळी व इतर फंड : | रु. ६०,७६,००० |
| एकूण ठेवी : | रु. ११,००,२६,००० |
| खेळतें भांडवल : | रु. २०,५०,००,००० |

### ११ जिल्ह्यांमध्यें ६० शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

**साखर कामगारांचें वेतन**—प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे कामगार व चालक ह्यांच्यांत कुशल व सामान्य कामगारांच्या वेतनश्रेणीबद्दल करार करण्यांत आला आहे. ह्या करारामुळें कामगारांना पूर्वीपेक्षा दरसाल ५०,००० रुपये अधिक मिळतील. कारखान्यांत दोन्ही प्रकारचे सुमारें १,००० कामगार आहेत.

**रेल्वेमार्गावरील जुनीं एंजिनें**—अखिल भारतीय रेल्वे-प्रवासी संघाचे उपाध्यक्ष श्री. काशीपरेख ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, भारतामधील रुंद रुळाच्या रेल्वेवर वापरण्यांत येणाऱ्या एंजिनांपैकी ३२ टक्के एंजिनें आणि अरुंद रुळावरील २६ टक्के एंजिनें ४० वर्षांपासून वापरण्यांत येत आहेत.

**विम्याच्या लोकप्रियतेबद्दल इषारा**—मिरज येथें आयुर्विम्याचें काम करणाऱ्या एजंटांना बक्षिसें देण्याच्या एका प्रसंगीं श्री. शंकरराव किर्लोस्कर म्हणाले कीं रोजच्या जीवनांत लागणाऱ्या वस्तूंच्या किंमती स्थिर राखण्यांत आल्या नाहींत तर विम्यावरील लोकांचा विश्वास उडून जाईल. वस्तूंच्या प्रमाणांत पैशाची किंमत कमी होतां कामा नये.

**पश्चिम जर्मनीकडून कर्ज**—पश्चिम जर्मनींतील मध्यवर्ती बँकेकडून जागतिक बँकेनें ४·८ कोटी डॉलर्सचें कर्ज काढलें आहे. कर्ज तीन वर्षांत फेडावयाचें असून व्याजाचा दर ३ टक्के आहे. ह्या खेपेला कर्जाची रक्कम मार्क्समध्यें घेण्यांत आली आहे. ह्यापूर्वी काढलेल्या तीन कर्जांची रक्कम मात्र डॉलर्समध्यें घेण्यांत आली होती.

**जपानकडून यंत्रसामुग्री**—जपान व भारत ह्यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें जपानकडून ४०,००० पौंड किंमतीची कापडाच्या गिरणीची यंत्रसामुग्री लवकरच भारतांत आयात करण्यांत येणार आहे. चालू महिन्याच्या अखेरीस यंत्रसामुग्री बोटीवर चढविण्यांत येईल. यंत्रसामुग्रीची किंमत हप्त्यानें द्यावयाची आहे.

**क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट योजना**—पगारदार लोक व मध्यमवर्गीय लोक ह्यांच्या सोईसाठी ही योजना सप्टेंबरच्या सुमारास सुरू होईल. ह्या योजनेचें स्वरूप स्थूलमानानें असें राहील:—व्यक्तीला दरमहा जास्तींत जास्त २०० रु. सरकारकडे ठेव म्हणून ठेवतां येतील. ठेवीवर ३½% चक्रवाढव्याज दिलें जाईल व बचतीवर प्राप्तीकर माफ असेल. दरमहा २० रु. ठेव ठेवली, तर पांच वर्षांनीं ठेवीदारास १,३०० रु. मिळतील; १० वर्षांनीं ती रक्कम २,९०० रु. होईल. बचतीच्या ५०% पर्यंत कर्ज मिळूं शकेल.

**कंपनीकायद्याची अंमलबजावणी सुकर होणार**—कंपनी कायद्यानें सरकारला दिलेले कांहीं अधिकार कंपनी लॉ ॲडमिनिस्ट्रेशनच्या चार प्रादेशिक डायरेक्टरांकडे सुपूर्त करण्याचें ठरविलें आहे. कंपनीच्या नांवांतील बदलास मान्यता, मुदतींत कंपनीची वार्षिक साधारण सभा चालकांनीं बोलाविली नाहीं तर ती बोलाविणें, ऑडिटराची नेमणूक करण्यांत आली नसल्यास ती करणें, कांहीं बाबतींत कंपनी गुंडाळण्याचा अर्ज कोर्टाकडे करण्यास रजिस्ट्रारला परवानगी देणें, इत्यादि संबंधांतील ते अधिकार आहेत. ह्यासंबंधीं प्रादेशिक डायरेक्टरांशीं पत्रव्यवहार त्या त्या राज्याच्या कंपनी रजिस्ट्रारमार्फत कंपन्यांनीं व लोकांनीं करावयाचा आहे.


५०

वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड

ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★


दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

श्री. वा. काळे ह्यांचीं

कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें

१ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल, ३ तुमचें स्थान कोणतें ?



किर्लोस्कर

इलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.

आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकरित्या काम करीत आहेत. सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.